मागणी क्रमांक आर-१, लेखाशिर्ष "२२१०३०६५" अंतर्गत अनुशेषांर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रे बांधकामासाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी निधी मंजुर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय, क्रमांकः संकीर्ण २०१९/प्र.क्र.२५१/आरोग्य ३

१० वा मजला, संकुल इमारत,
जी.टी. रुग्णालय आवार, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : ३० ऑगस्ट, २०१९.

वाचा :

१) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांकः अर्थसं-२०१८/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक ०१.०४.२०१९.
२) आरोग्य सेवा संचालनालय, पत्र क्रमांकः संआसे/कक्ष-७अ/टे-४/प्रादेशिक अनुशेष/२०१९-२० निधी वित.प्रस्ताव/४३५३/२०१९, दिनांक २३.०७.२०१९.

प्रस्तावना :

राज्यातील प्रादेशिक अनुशेष दूर करण्यासाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी मंजुर असलेला रु. ५०.२४ कोटी निधीपैकी ६० टक्के रु. ३०.१४ कोटी इतका निधी वित्त विभागाच्या सुचनेनुसार मंजुर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

उपरोक्त संदर्भाधीन अनुक्रमांक-१ सदर्भ क्र. १ येथील शासन परिपत्रकान्वये "महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०१९" (महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) अधिनियम, २०१९ यांच्या अनुसूचीच्या स्तंभ ४ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या रकमांसह) यास महाराष्ट्र विधानमंडळाने मंजूरी दिली असून, महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी त्यास अधिसंमती दिलेली आहे आणि ते २०१९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ०८ म्हणून महाराष्ट्र राजपत्र असाधारण भाग-४, दिनांक ०४.०७.२०१९ अन्वये प्रसिध्द करण्यात आला आहे. त्यास अनुसरुन सन २०१९-२० च्या अर्थसंकल्पीय निधीच्या ६० टक्केच्या मर्यादेत रु.३०.१४ कोटी निधी मंजुर करण्यात आला आहे. सदर निधीच्या मर्यादेत प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र मुख्य इमारत व निवासस्थान बांधकाम, फर्निचर, पाणी पुरवठा, विदयुतीकरण, संरक्षण भिंत बांधकाम प्रलंबीत देयके इत्यादी कामासाठी रु.२७.५४ कोटी इतका निधी कामनिहाय सोबत जोडण्यात आलेल्या प्रपत्र “अ”नुसार खालील अटीच्या अधिन राहून वितरीत करण्यात येत आहे.

<u>अटी व शर्ती</u> :-

१) कामासाठी निविदा मागविण्याआधी सदर कामास संबंधित विभागातील सक्षम अधिकाऱ्यांची तांत्रिक मंजुरी घेणे आवश्यक राहील.
२) कामाची निविदा काढतांना प्रत्येक कामाची स्वतंत्रपणे निविदा काढण्यात यावी.
३) कामासाठीच्या जागेची उपलब्धता, योग्यता व जागा पुरेशी आहे किंवा नाही याबाबतची खात्री संबंधित आरोग्य संस्था प्रमुखांनी करावी.
४) कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद व जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी प्रत्यक्ष आरोग्य संस्थांची पाहणी करुन त्यानुसार सविस्तर अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन काम करण्यात यावे.
५) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.इएनव्ही-२०१३/प्र.क्र.१७७/तां.क.१ दि. १० जानेवारी,२०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.
६) उपरोक्त कामे सदर रक्कमेत पूर्ण होतील यांची दक्षता घ्यावी.

३. सदर प्रस्तावावरील खर्च मागणी क्रमांक- आर-१, मुख्यलेखाशिर्ष "२२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०६- सार्वजनिक आरोग्य, ८००- इतर खर्च, प्रादेशिक असमतोल दूर करण्याकरीता योजना- स्थानिक क्षेत्रातील योजना (राज्य योजना), (०१)(०७) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याच्या कलम १८७ अन्वये योजनांतर्गत योजनांकरिता अनुदान (२२१० ३०६५), ३१ सहायक अनुदान (वेतनेतर)" याखालील सन २०१९-२० करिता उपलब्ध असलेल्या निधीमधून खर्ची टाकण्यात यावे.

४. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारितील सर्व नियंत्रक अधिकाऱ्यांना असे कळविण्यात येते की, सोबत जोडलेल्या विवरणपत्र “अ” मध्ये नमूद केल्याप्रमाणे रुपये २७.५४ कोटी (अक्षरी रुपये सत्तावी कोटी चोपन्न लक्ष फक्त) इतक्या निधीचे कामनिहाय वाटप करण्यात यावे व अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर वितरीत करण्यात आलेला सदर निधी उपलब्ध करुन दिल्यानुसारच खर्च करण्यात यावा. या व्यातिरिक्त दुसऱ्या कामावर सदर निधी खर्च करावयाचा झाल्यास त्यास शासनाची परवानगी घेण्यात यावी. तसेच मंजुर करण्यात आलेल्या निधी पेक्षा अधिक खर्च होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

५. सदर शासन निर्णय, वित्त विभागाचे शासन परिपत्रक, क्रमांकः अर्थसं -२०१८/प्र.क्र. ६९/अर्थ-३, दिनांक ०२ एप्रिल, २०१८ मान्यतेस अनसरुन निर्गमीत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८३०१४५४४९३०१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Roshani Dinesh Kadam Patil

Digitally signed by Roshani Dinesh Kadam Patil
DN: CN = Roshani Dinesh Kadam Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2019.08.31 11:11:01 +05'30'

(रो.दि. कदम पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र १/ २ (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरीक्षा), मुंबई/ नागपूर.

२. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.

३. जिल्हा कोषागार अधिकारी. (परभणी/नांदेड/सातारा/बीड/कोल्हापूर/हिंगोली बुलढाणा/जळगाव/सांगली)

४. सह संचालक, रुग्णालये (जिल्हास्तर), आरोग्य सेवा, मुंबई.

५. सर्व उप संचालक, आरोग्य सेवा मंडळे.

६. जिल्हा आरोग्य अधिकारी . (परभणी/नांदेड/सातारा/बीड/कोल्हापूर/हिंगोली बुलढाणा/जळगाव/सांगली)

७. नियंत्रक, लेखा व लेखापरीक्षा, आरोग्य सेवा संचालनालय, पुणे.

८. वित्त विभाग (अर्थसं ३), मंत्रालय, मुंबई.

९. सार्वजनिक आरोग्य विभाग (कार्यासन- अर्थसंकल्प/ आरोग्य ३-अ, आरोग्य ४), मंत्रालय, मुंबई.

१०.निवडनस्ती (आरोग्य ३).

प्रपत्र “अ”

संकीर्ण -२०१९/प्र.क्र.२५१/आरोग्य-३ दि.३०.०८.२०१९ (रु. लाखात)			
अ.क.	**जिल्हा**	**आरोग्य संस्थांचे नाव**	**मंजुर निधी**
१	**परभणी**	प्राथमिक आरोग्य केंद्र आर्वी. ता.परभणी	१६५.००
२		प्राथमिक आरोग्य केंद्र, एरंडेश्वर ता. पुर्णा	३६.००
३		प्राथमिक आरोग्य केंद्र बनवस ता. पालम	५०.००
४		प्राथमिक आरोग्य केंद्र, शेळगांव ता. सोनपेठ	५०.००
५		प्राथमिक आरोग्य केंद्र चिकलठाणा ता. सेलू	६५.००
६		प्राथमिक आरोग्य केंद्र,भोगांव ता. जिंतूर	५०.६७
७		प्राथमिक आरोग्य केंद्र आसोला ता. परभणी	२५.००
८		प्राथमिक आरोग्य केंद्र चिकलठाणा ता. सेलू	१५.००
९		प्राथमिक आरोग्य केंद्र,मरडसगाव ता. गंगाखेड	१३०.००
		एकूण	**५८६.६७**
१०	**नांदेड**	प्राथमिक आरोग्य केंद्र, सरसम ता. हिमायतनगर	४४.००
११		प्राथमिक आरोग्य केंद्र, चिंचोर्डी ता. हिमायतनगर	४०.००
१२		उपकेंद्र पोटा ता. हिमायतनगर	१५.००
		एकूण	**९९.००**
१३	**सातारा**	प्राथमिक आरोग्य केंद्र, मस्करवाडी	३०.००
१४		प्राथमिक आरोग्य केंद्र, येंळगाव	३०.००
१५		प्राथमिक आरोग्य केंद्र, म्हासोली	३०.००
१६		प्राथमिक आरोग्य केंद्र, वडूथ	३०.००
१७		प्राथमिक आरोग्य केंद्र, माहुली	३०.००
१८		प्राथमिक आरोग्य केंद्र,अंगापूर वंदन	३०.००
१९		प्राथमिक आरोग्य केंद्र,लोहम	३०.००
२०		प्राथमिक आरोग्य केंद्र, वेणेगांव	३०.००
२१		प्राथमिक आरोग्य केंद्र पवारवाडी	५०.००
२२		प्राथमिक आरोग्य केंद्र निनाम	५०.००
		एकूण	**३४०.००**

संकीर्ण -२०१९/प्र.क्र.२५१/आरोग्य-३ दि.३०.०८.२०१९

(रु. लाखात)

अ.क.	जिल्हा	आरोग्य संस्थांचे नाव	मंजुर निधी
२३	**बीड**	प्राथमिक आरोग्य केंद्र, टाकळसिंगी ता. आष्टी	५०.००
२४		प्राथमिक आरोग्य केंद्र मादळमोही, ता. गेवराई	५०.००
२५		प्राथमिक आरोग्य केंद्र, आडस ता. केज	१३५.००
२६		उपकेंद्र, आंबीलवडगाव, ता.बीड	२५.००
२७		उपकेंद्र, बेलकंडी, ता.बीड	२०.००
२८		उपकेंद्र, शिरसमर्गा, ता. गोवराई	१३.९६
२९		उपकेंद्र, घोडका राजुरी, ता. बीड	२५.००
३०		उपकेंद्र पौडूळ, ता. शिरुर	३०.००
३१		उपकेंद्र पारनेर, ता. पाटोदा	८.०४
३२		प्राथमिक आरोग्य केंद्र राजेगाव	१००.००
३३		प्राथमिक आरोग्य केंद्र राजुरी	५५.००
		एकूण	**५१२.००**
३४	**कोल्हापूर**	प्राथमिक आरोग्य केंद्र, आरळे	५०.००
३५		प्राथमिक आरोग्य केंद्र, कवठेगुलंद	४५.००
३६		प्राथमिक आरोग्य केंद्र, शित्तूर वारुण	३०.००
३७		प्राथमिक आरोग्य केंद्र,सांबरे	१८५.००
३८		प्राथमिक आरोग्य केंद्र, तुर्केवाडी	२०.००
३९		प्राथमिक आरोग्य केंद्र, भडगांव	२०.००
४०		प्राथमिक आरोग्य केंद्र, कुरुकली	२०.००
४१		प्राथमिक आरोग्य केंद्र कवठेगुलंद	१०.००
४२		प्राथमिक आरोग्य केंद्र उदगांव	२०.००
४३		प्राथमिक आरोग्य केंद्र, उंचगांव	२०.००
		एकूण	**४२०.००**
४४	**हिंगोली**	प्राथमिक आरोग्य केंद्र, रामेश्वर तांडा ता. कळमनुरी	१५०.००
४५		प्राथमिक आरोग्य केंद्र, पोत्रा, ता. कळमनूरी	५०.००
४६		उपकेंद्र, जांभरुन तांडा ता. हिंगोली	२५.००
४७		उपकेंद्र, डिग्रस ता. हिंगोली	२५.००

संकीर्ण -२०१९/प्र.क्र.२५१/आरोग्य-३ दि.३०.०८.२०१९ (रु. लाखात)			
अ.क.	**जिल्हा**	**आरोग्य संस्थांचे नाव**	**मंजुर निधी**
४८		प्राथमिक आरोग्य केंद्र लोहारा	५०.००
		एकूण	**३००.००**
४९	**जळगाव**	प्राथमिक आरोग्य केंद्र, शिंदाड	**२०.००**
५०	**जालना**	प्राथमिक आरोग्य केंद्र तळणी	५०.००
५१		प्राथमिक आरोग्य केंद्र कुभारझरी	१०.००
५२		प्राथमिक आरोग्य केंद्र जिरडगांव	५०.००
		एकूण	**११०.००**
५३	**सांगली**	उपकेंद्र संतोषवाडी ता. मिरज	**१०.००**
५४	**बुलढाणा**	प्राथमिक आरोग्य केंद्र, रोहणा	८१.८८
५५		प्राथमिक आरोग्य केंद्र, उंद्री	८२.६२
५६		प्राथमिक आरोग्य केंद्र,वरवंड	३९.९८
		एकूण	**२०४.४८**
५७	**अहमदनगर**	प्राथमिक आरोग्य केंद्र शिरसगांव	१३२.३६
५८		प्राथमिक आरोग्य केंद्र देवगांव	२०.००
		एकूण	**१५२.३६**
		एकूण सर्व	**२७५४.५१**